**नि.फौ.ख.क्र.१६३/२०२२**
**सरकार वि. राजेश**
**नि.क्र.०८**

साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–राकेश मोरेश्वर आडे.
वय ३४ वर्ष, व्यवसाय–होमगार्ड.
राह.परसोडी, तह.उमरेड, जि.नागपुर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी दि.२८/०८/२०२२ रोजी पोलिसांनी मला कुठेच बोलविले नव्हते. माझ्यासमक्ष पंचनाम्याची कारवाई केली नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नव्हता सहीपुरता **निशानी क्र.०९** देण्यात आला. पोलिसांनी माझे फोटो काढले होते त्यात माझा फोटो आहे त्याला **आर्टीकल अ** देण्यात आले.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८/०८/२०२२ रोजी पोलिसांनी मला परसोडी गावातील सावडी ते हळदगांवा जाणा–या डांबरी रोडवर बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने फिर्यादीला बासाच्या काठीने मारल्याबाबतचा पंचनामा माझ्यासमक्ष तयार करण्यात आला होता. हे मला माहीत नाही की, त्यावेळी दुसरा पंच तुळशीराम पाटील तेथे हजर होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की,माझ्यासमक्ष घटनास्थळावरून एक बासाची काठी जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीने व्यक्तीश: उलटतपास नाकारला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि २८.०२.२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड